65

# पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त

**मेसर्स.अनुराज शुगर्स लिमिटेड यांच्या गट.नं ७८५/१/अ, ७८५/१/ब, ७८५/२, ७८६/१, ७९३, ७९४, ७९५, ७९६, ७९७ गाव- यवत, ता. दौंड, जिल्हा- पुणे,राज्य- महाराष्ट्र या ठिकाणी प्रस्तावित मळीवर आधारित ३० किलो लिटर प्रति दिन आसवणी प्रकल्पासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचे इतिवृत्त**

दिनांक : ०४/०२/२०२१

वेळ : सकाळी ११.३० वाजता

स्थळ : प्रकल्प स्थळ, गट. नं ७८५/१/अ, ७८५/१/ब, ७८५/२, ७८६/१, ७९३, ७९४, ७९५, ७९६, ७९७ गाव- यवत, ता. दौंड, जिल्हा- पुणे, राज्य महाराष्ट्र.

**प्रस्तावना:-**

मेसर्स.अनुराज शुगर्स लिमिटेड यांनी गट.नं ७८५/१/अ, ७८५/१/ब, ७८५/२, ७८६/१, ७९३, ७९४, ७९५, ७९६, ७९७ गाव- यवत, ता. दौंड, जिल्हा- पुणे,राज्य- महाराष्ट्र या ठिकाणी प्रस्तावित मळीवर आधारित ३० किलो लिटर प्रति दिन आसवणी प्रकल्पासाठी प्रकल्पधारकाने पर्यावरण मंजूरीकरिता पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई,मंत्रालय, यांना अर्ज सादर केल्यानंतर राज्य पर्यावरण मुल्यांकन तज्ञ समिती (SEAC) यांनी त्यांच्या दिनांक १० ऑक्टोबर, २०१९ रोजी झालेल्या १६९ व्या (दिवस-१) तर राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण (SEIAA) यांनी त्यांच्या दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी झालेल्या १८३ व्या (दिवस-३) बैठकीमध्ये सदर प्रस्थावित प्रकल्पास प्राथमिक मान्यता (ToR) जारी केले. पर्यावरण प्रभाव मुल्यांकन २००६ च्या तरतुदीनुसार पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे व त्याबाबत प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे यांचा सामावेश करून नवीन पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवाल सादर करण्याचे निर्देश आहेत.

प्रकल्प व्यवस्थापनाने पर्यावरण विषयक जनसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे उपरोक्त प्रकल्पाकरीता अर्ज केल्यावर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, पुणे व जिल्हाधिकारी, पुणे यांच्या समन्वयाने दि. ०४.०२.२०२१ ही तारीख निश्चित करण्यात आली. पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदी प्रमाणे सदर जनसुनावणीची जाहीर सुचना, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दि. ०१.०१.२०२१ रोजीच्या मराठी दैनिक “लोकसत्ता” व इंग्रजी दैनिक “द इंडियन एक्सप्रेस” मध्ये तसेच शुध्दिपत्र दि.०२/०१/२०२१ च्या मराठी दैनिक लोकसत्ता मध्ये प्रसिध्द केली. वृत्तपत्रातील जाहीर सुचनेच्या जाहिरातीद्वारे सर्व संबंधित व्यक्तींना त्यांच्या सुचना, टीकाटिप्पणी, विचार, आक्षेप इत्यादी संबंधित नियामक प्राधिकरण येथे नोंदविण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

या प्रकल्पाबाबत प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी प्रत खालील कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनाकरीता/ संबंधितांच्या अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आली.

67

१) पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०००३२
२) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था ळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु.) मुंबई - ४०० ०२२
३) प्रादेशिक कार्यालय व उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जोग सेंटर,३ रा मजला, मुंबई-पुणे रोड, वाकडेवाडी,पुणे, महाराष्ट्र- ४११ ००३
४) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
५) जिल्हा परिषद, पुणे
६) जिल्हा उद्योग केंद्र, पुणे
७) उप-विभागीय कार्यालय, पुणे
८) तहसिल कार्यालय, ता-दौंड, जिल्हा-पुणे
९) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,पुणे
१०) पंचायत समिती कार्यालय, ता-दौंड, जिल्हा-पुणे
११) ग्रामपंचायत कार्यालय,गाव-यवत, ता-दौंड, जिल्हा-पुणे

वरील अनुक्रमांक ४ ते ११ वर नमूद शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर या जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिद्धी देण्याबाबत कळविण्यात आले होते. अशा तऱ्हेने जाहीर जनसुनावणी बाबत अधिसूचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरूपात प्रसिध्दी देण्यात आली जेणेकरुन प्रकल्प बाधित अथवा संबंधित व्यक्तीना त्यांचे आक्षेप, टिका टिप्पणी, विचार अथवा सुचना संबंधित नियामक प्राधिकरणास नोंदविणे सोईचे होईल.

जनसुनावणीचे स्थळ प्रकल्प स्थळ, गट.नं ७८५/१/अ, ७८५/१/ब, ७८५/२, ७८६/१, ७९३, ७९४, ७९५, ७९६, ७९७ गाव- यवत, ता. दौंड, जिल्हा- पुणे,राज्य- महाराष्ट्र निवडण्यात आले कारण हे स्थळ प्रकल्पाजवळचे असुन संबंधितांना सोईस्कर असल्याने या ठिकाणी जनसुनावणी ठेवण्यात आली.

पर्यावरण वन व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १४/०९/२००६ च्या पर्यावरण प्रभाव मुल्यांकनअधिसूचने नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत केली.

**१. डॉ. जयश्री कटारे** - **अध्यक्ष,**
**अप्पर जिल्हा दंडाधिकारी,पुणे**

**२. श्री. नितीन शिंदे** - **सदस्य,**
**प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पुणे**

**३. श्री. प्रताप जगताप,** **- समन्वयक,**
**उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पुणे-१**

सदर प्रकल्पाबात प्राप्त झालेल्या तक्रारी, आक्षेप, निवेदन, प्रश्न व जनसुनावणी दरम्यान एकूण उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी गठीत केलेल्या समितीचा आदेश अनुक्रमे सहपत्र-२, ३ व ४ प्रमाणे सोबत जोडलेले आहे.

**जनसुनावणीचे इतिवृत्तः-**

जनसुनावणीच्या सुरुवातीस श्री. प्रताप जगताप, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे-१ यांनी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे अध्यक्ष, प्रकल्प प्रस्थावक,व उपस्थित अभ्यगतांचे स्वागत करुन पर्यावरण वन व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १४/०९/२००६ व त्यानंतरच्या १ डिसेंबर २००९ च्या दुरुस्ती नुसार पर्यावरण प्रभाव मुल्यांकनअधिसूचने नुसार घेण्यात येणाऱ्या पर्यावरणीय जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहीती दिली.त्यांनी उपस्थितांना पर्यावरण विषयक,सुचना,विचार,आक्षेप इत्यादी घेऊन पुढे यावे अशी विनंती केली.तसेच त्यांनी हि सुनावणी सर्व संबंधित लोकांसाठी आयोजीत केलेली आहे जेणेकरुन त्यांचे पर्यावरण विषयक प्रश्न/शंकाचे निरसन करण्यात येईल असे सांगितले. त्यानंतर त्यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याबाबत विनंती केली.

डॉ. जयश्री कटारे, जनसुनावणी समितीचे अध्यक्षा तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पुणे यांनी उपस्थित जनसमुदायास . मेसर्स.अनुराज शुगर्स लिमिटेड यांनी गट.नं ७८५/१/अ, ७८५/१/ब, ७८५/२, ७८६/१, ७९३, ७९४, ७९५, ७९६, ७९७ गाव- यवत, ता. दौंड, जिल्हा- पुणे,राज्य- महाराष्ट्र या ठिकाणी प्रस्तावित मळीवर आधारित ३० किलो लिटर प्रति दिन आसवणी प्रस्तावाबाबत आपल्या सुचना, विचार,आक्षेप घेऊन पुढे यावे अथवा त्या लेखी स्वरुपात मांडाव्यात, आपण व्यक्त केलेले मत तसेच सुचना व आक्षेप या अधिसूचनेत नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, यांना कळविण्यात येतील, सदर सुनावणीचे छायाचित्रीकरण व व्हिडीओ शुटींग म.प्र.नि.मंडळाकडुन कायद्यातील तरतुदी प्रमाणे करण्यात येत आहे, तरी प्रत्येकाने आपले प्रश्न शांतपणे व सनदशिर मार्गाने उपस्थित करावेत व जन सुनावणी शांतपणे पार पाडण्यात सहकार्य करावे असे आवाहन केले.तसेच प्रत्येकाने आपले प्रश्न विचारण्यापुर्वी आपले नाव व पत्ता सांगावा जेणे करुन सुनावणीच्या इतिवृत्तांत बनविते वेळी नमुद करण्यात येतील. त्यानंतर त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहीती उपस्थितांना देण्यात यावी तसेच त्यांनी प्रकल्पाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांचे शंकानिरसन करावे अशी विनंती केली.

त्यानंतर श्री. निलेश देशमुख (पर्यावरण सल्लागार) आणि श्री. दीपक देसाई, (डिस्टिलरी सल्लागार) यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पांबाबत पर्यावरण विषयक केलेला अहवाल मराठी व इंग्रजी भाषेत सादर केला.सादरीकरणात प्रामुख्याने प्रकल्पाबाबत खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहीती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, सिमा, अक्षाश-रेखांश, नकाशा, लाभ क्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्टय, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमिन वापर, भुकंप स्थिरता
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांचा प्रकल्पामुळे होणारा विकास
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषन
- हवा,पाणी,जमिन,ध्वनी,विस्थापन इत्यादी बाबतची माहीती.
- नियोजीत प्रकल्पांमुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन.
- प्रकल्प चालु झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहीती.
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहीती

प्रकल्पधारकाने पर्यावरण विषयीची सविस्तर माहीती दिल्यानंतर सुनावणीचे आयोजक यांनी असे आवाहन केले की, यानंतर आक्षेप/सुचना/प्रश्न व उत्तरे घेतले जातील. आपणांस विनंती की, सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत व त्यांचे समर्पक उत्तर प्रकल्प धारकाने द्यावे.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पण्या, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे:**

**१) श्री. स्वप्नील नामदेव शिर्के, गाव-यवत, ता.दौंड, जि.पुणे**

| अ.क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रस्तावक / पर्यावरण सल्लागाराने दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रस्तावित प्रकल्पातून म्हणजेच इथेनॉल प्रकल्पामधून उत्सर्जन वारंवार निर्माण होईल, जेणेकरून हवेच्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोण-कोणत्या उपाययोजना केल्या जातील? | प्रकल्प पर्यावरण सल्लागाराने उत्तर दिले की, प्रदूषण नियंत्रणाचे मुख्य उपाय म्हणून हवेतील उत्सर्जन नियंत्रित करण्यासाठी चिमणी ला (स्टॅकला) इलेक्ट्रोस्टेटिक प्रेसिपिटेटर ही यंत्रणा बसविण्यात येईल.<br>हा बॉयलर बॅगस वर चालेल.<br>वायू प्रदूषणाचा प्रभाव कमी करण्यासाठी योग्य हरितपट्टा विकसित केला जाईल. हरितपट्टा केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (सी.पी.सी.बी.) च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विकसित केले जाईल.<br>त्यांनी सांगितले की, अनुराज शुगर्स लिमिटेड २१.२५ एकर क्षेत्रात एकूण हरितपट्टा विकसित करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. प्रस्तावित आसवनी प्रकल्प आणि विद्यमान साखर कारखान्याच्या आजूबाजूला सुमारे ५००० हून अधिक झाडे लावली जातील.<br>कच्च्या मालाच्या साठवण यार्डमधून होणारे उत्सर्जन, लोडिंग आणि अनलोडिंग,ऑपरेशन्स, होणारे उत्सर्जन नियंत्रित करण्यासाठी नियमित पाणी फवारणी केली जाईल. |

**२) श्री. संजय महादेव जगताप, गाव- यवत, ता. दौंड, जि.पुणे**

| अ.क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रस्तावक / पर्यावरण सल्लागाराने दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| २) | हरितपट्टा विकास योजनेत कोणत्या | प्रकल्प पर्यावरण सल्लागाराने माहिती दिली की, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार एकूणप्रकल्प |

| | | |
|---|---|---|
| | प्रकारचे झाडे लावले जाईल? | क्षेत्राच्या ३३% क्षेत्रफळ हे हरितपट्टा विकसित करणे आवश्यक आहे. अनुराज शुगर्स लिमिटेड २१.२५ एकर क्षेत्रात एकूण हरितपट्टा विकसित करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे.<br><br>सी.पी.सी.बी. च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार स्थानिक प्रजाती उद्योगाच्या आवारात आणि रस्त्याच्या कडेला लावल्या जातील. प्रकल्पाच्या हद्दीत मोठी झाडे लावली जातील आणि बांधकामाच्या सुरुवातीच्या टप्प्यात लागवड केली जाईल.<br><br>रस्त्याच्या कडेला झुडूप आणि मध्यम उंचीची झाडे लावली जातील. प्रकल्प हद्दीतील वृक्षारोपण आतील बांधकाम पूर्ण झाल्यानंतर केले जाईल.<br><br>तीन वर्षांच्या वृक्षारोपण कार्यक्रमाच्या कालावधीत ५००० हून अधिक झाडे लावण्यात येणार आहेत. प्रस्तावित डिस्टिलरी युनिट आणि विद्यमान साखर युनिटच्या सभोवताल चिच, कडुनिंब, पिंपळ आणि अशोकासारख्या स्थानिक वनस्पतींची लागवड केली जाईल. |

**३) श्री. अविनाश उत्तम गायकवाड, गाव- कासुर्डी, ता.दौंड, जि.पुणे**

| अ.क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रस्तावक / पर्यावरण सल्लागाराने दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| ३) | प्रस्तावित प्रकल्पामुळे स्थानिकांना नोकरीच्या संधींमध्ये प्राधान्य दिले जाईल का?<br><br>त्यामध्ये पुरुष व स्त्रियांचे प्रमाण किती असेल? | प्रकल्प पर्यावरण सल्लागाराने उत्तर दिले की कुशल, अर्धकुशल, अकुशल लोकांना, ७०-१०० पेक्षा जास्त स्थानिक ग्रामीण लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार दिले जातील.<br><br>स्थानिक लोक सध्याच्या विद्यमान प्रकल्पात काम करत आहेत.<br><br>प्रस्तावित प्रकल्पासाठी शिक्षण, अनुभव आणि गुणवत्तेच्या निकषांच्या आधारे आवश्यकतेनुसार पुरुष आणि स्त्रिया नियुक्त केले जातील. |

४) श्री. अतुल सुरेश बैराट, गाव- खामगाव, ता. दौंड, जि.पुणे

| अ.क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रस्तावक / पर्यावरण सल्लागाराने दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| ४) | बॉयलरमधून निघणाऱ्या राखेचा कृषी उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. प्रभाव टाळण्यासाठी आणि कोणत्या प्रकारचे व्यवस्थापन केले आहेत? | प्रकल्प पर्यावरण सल्लागाराने उत्तर दिले की. प्रस्तावित इंसिनरेशन (भस्मीकरण) बॉयलरमधून दोन प्रकारची राख निघेल, फ्लाय ऍश आणि बॉटम ऍश<br><br>भस्मीकरण बॉयलरमधून निघालेली राख हि सायलो मध्ये गोळा केली जाईल आणि वीट उत्पादनाच्या युनिटला विकली जाईल किंवा कंपोस्ट साठी वापरली जाईल.<br><br>सायलोमधून राखेचे उत्सर्जन नियंत्रित करण्यासाठी बॅग फिल्टर बसवण्यात येतील.<br><br>बॉटम एश हि कन्व्हेयरद्वारे विल्हेवाट क्षेत्रात साठवली जाईल. |

५) श्री. अतुल अर्जुन थोरात ता. दौंड, जि.पुणे

| अ.क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रस्तावक / पर्यावरण सल्लागाराने दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| ५) | प्रस्तावित प्रकल्पाची दुषित पाणी व्यवस्थापन योजना काय आहे? | प्रकल्प पर्यावरण सल्लागाराने अशी माहिती दिली की, प्रस्तावित प्रकल्प हा शून्य निष्कसन यंत्रणा (झेड.एल.डी.) तंत्रज्ञानावर आधारित आहे. कारखान्याबाहेरील सांडपाणी सोडण्याची परवानगी दिली जाणार नाही.<br><br>घरगुती सांडपाण्यावर सांडपाणी प्रक्रिया संयंत्रात उपचार केले जातील आणि त्याचा प्रकल्प आवारात हरितपट्टा विकसित करण्यासाठी पुन्हा उपयोग केला जाईल.<br><br>प्रोसेस कंडेन्सेट, स्पेंट लीज, बॉयलर आणि कुलिंग टॉवर ब्लो डाऊन हे दुषित पाण्याचे प्रमुख स्रोत आहेत.<br><br>प्रोसेस कंडेन्सेटमधून निघणाऱ्या पाण्यावर कंडेन्सेट ट्रीटमेंट प्लांटमध्ये प्रक्रिया केली जाईल. प्रक्रियाकृत केलेल्या सांडपाण्याचा पुन्हा प्रक्रियेत पुनर्वापर केला जाईल. डीस्टीलेशन |

| | | |
|---|---|---|
| | | प्रक्रियेतून निघालेले स्पेंट लीजचा हि पुन्हा प्रक्रियेत पुनर्वापर केला जाईल.<br><br>डीस्टीलेशन प्रक्रियेतून निघालेले स्पेंट वॉशवर ईन्सिनरेशन मध्ये प्रक्रिया केली जाईल. बॉयलर आणि कुलिंग टॉवर ब्लो डाऊनमधून निघालेल्या पाण्याचा फ्लशिंगसाठी वापर केला जाईल. |

**६) श्री. अमोल अशोक टेकावडे, गाव- कासुर्डी, ता.दौंड, जि.पुणे**

| अ.क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रस्तावक / पर्यावरण सल्लागाराने दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| ६) | प्रस्तावित प्रकल्पाची पाणी व्यवस्थापन योजना काय आहे? | प्रकल्प पर्यावरण सल्लागाराने माहिती दिली की, डिस्टिलरीसाठी प्रारंभास एकूण ६३२ घनमिटर/दिन पाण्याची आवश्यकता असेल., प्रक्रियाकृत सांडपाण्याचा पुर्नवापर केल्यास दररोज २६० घनमिटर/दिन फ्रेश पाण्याची आवश्यकता असेल.<br><br>निराकालव्यातुन पाणी उचलण्याबाबत, खडकवासला पाटबंधारे विभागाकडून दि. १६ जुलै,२०१९ रोजी परवानगी मिळालेली आहे. |

**७) श्री. रामदास थोरात, ता. दौंड, जि.पुणे**

| अ.क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रस्तावक / पर्यावरण सल्लागाराने दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| ७) | प्रस्तावित प्रकल्पात मळीचे व्यवस्थापन कसे करण्यात येईल? | प्रकल्प पर्यावरण सल्लागाराने माहिती दिली की, प्रस्तावित आसवनी प्रकल्प हा मळीवर आधारित आहे. मळी हा आसवनीचा मुख्य कच्चा माल आहे जो इथेनॉलच्या उत्पादनासाठी वापरला जातो. |

**८) श्री. नितीन शिंदे, प्रादेशिक अधिकारी, एम.पी.सी.बी., पुणे**

| अ.क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रस्तावक / पर्यावरण सल्लागाराने दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| ८) | प्रस्तावित प्रकल्पाच्या बॉयलरसाठी कोणत्या प्रकारचे प्रदूषण नियंत्रण यंत्र बसवले जाईल? | प्रकल्प पर्यावरण सल्लागाराने सांगितले की, प्रस्तावित डिस्टिलरी बॉयलर क्षमता १५ टन प्रति तास (टी.पी.एच.) असून हवा प्रदूषण |

| | | |
|---|---|---|
| | म्हणजे इलेक्ट्रोस्टेटिक प्रेसिपिटेटर की वेट स्क्रबर? | नियंत्रणाकरिता इलेक्ट्रोस्टेटिक प्रेसिपिटेटर ही यंत्रणा बॉयलरला बसवण्यात येईल. |

| अ.क्र. | सूचना |
|---|---|
| ९) | महामार्गापासून कारखान्यापर्यंतचा रस्ता दुरुस्त करावा, अशी सूचना केली, त्यामुळे वाहतुक सुलभ होईल आणि धूळीचे प्रदूषण कमी होईल.<br>बंदी असलेल्या प्लॅस्टिकचा वापर करु नये.<br>सीएसआर निधीचा उपयोग स्थानिक लोकांच्या गरजेनुसार करावा.<br>हरित पट्टा लवकरात लवकर विकसीत करावा तसेच मोठ्या झाडांचे लागवड करावी. |

प्रकल्प पर्यावरण सल्लागाराने त्या सूचनांचे पालन करण्याचे वचन दिले.

**९) डॉ. जयश्री कटारे, अप्पर जिल्हा दंडाधिकारी, पुणे**

| अ.क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रस्तावक / पर्यावरण सल्लागाराने दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १०) | सी.ई.आर.ची जी ४१.२० लाख रक्कम आहे ती फक्त ५ वर्षासाठीच आहे का ? | प्रकल्प पर्यावरण सल्लागाराने उत्तर दिले की, दिनांक १ मे २०१८ रोजी पर्यावरण व वन मंत्रालयाने प्रकाशित केलेल्या सी.ई.आर. अधिसूचनेच्या आधारे सी.ई.आर. योजना तयार केली गेली आहे.<br>अधिसूचनेनुसार सी.ई.आर. कार्यक्रम किमान ३ वर्षे व जास्तीत जास्त ५ वर्षांसाठी तयार केला जातो. |
| ११) | सी.ई.आर. योजनेनुसार हरितपट्टा विकासासाठी कोणत्या महिन्यांचा विचार केला गेला आहे?<br>सी.ई.आर. अंतर्गत एकूण ५००० झाडे लावण्याचा प्रस्ताव आहे.<br>एकूण किती झाडे लावली आहेत आणि किती झाडे लावायची बाकी आहेत? | प्रकल्प पर्यावरण सल्लागाराने उत्तर दिले की, जून २०२० ते जून २०२१ हे वर्ष हरितपट्टा विकासासाठी विचारात घेतले आहे.<br>कारखान्याच्या आजूबाजूला २००० झाडे लावण्यात आली असून उर्वरित झाडे दरवर्षी सी.ई.आर. अंतर्गत लावली जातील. |
| १३) | सी.ई.आर. अंतर्गत कोणते कार्यक्रम राबविले जातात? | मे.अनुराज शुगर लिमिटेडचे, मुख्य अभियंता श्री. राजेंद्र गाढवे उत्तर दिले की, सी.ई.आर. उपक्रमा अंतर्गत शाळेला शैक्षणिक सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. उदाहरणार्थ बेंच व डेस्क, शाळेचे नूतनीकरण.<br>कारखाना साइटवर आरोग्य शिबिराची व्यवस्था, |

| | | |
|---|---|---|
| | | कामगारांना वैद्यकीय सुविधा पुरविली.<br>कोविद -१९ काळात आरोग्य सुविधा तसेच मेडिकल यंत्र सामुग्री प्रदान केली.<br>जवळच्या खेड्यांना सौर पॅनेल दिले. |
| | **सूचना** | |
| १४) | प्रकल्प क्षेत्राच्या आत फायर ऑडिट सिस्टम विकसित केली जावी.<br>प्रकल्प प्रस्तावकांना कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सी.एस.आर.) फंड आणि कॉर्पोरेट एन्व्हायर्नमेंट रिस्पॉन्सिबिलिटी (सी.ई.आर.) फंडाचा तपशील देण्याचे निर्देश दिले.<br>सी.एस.आर. फंडाअंतर्गत विविध सामाजिक उपक्रम राबविणे प्रकल्प प्रस्तावांना बंधनकारक आहे. सी.ई.आर. फंडाअंतर्गत करावयाच्या कामाकरीता, जिल्हा प्रशासनाकडून पूर्व मान्यता घेणे व विविध समाजकल्याण कार्यक्रम राबविणे देखील प्रकल्प प्रस्तावांना बंधनकारक आहे.<br>तरुण पुरुष व महिलांना प्रकल्पात नोकरीच्या संधी मिळायला हव्या अशा सूचना दिल्या. | |

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी उपस्थित असलेल्या नागरीकांना आणखी काही प्रश्न/आक्षेप/सूचना असतील तर विचारण्याचे आव्हान केले. मात्र कोणीही तद्नंतर प्रश्न/सूचना/आक्षेप उपस्थित केले नाहीत. त्यानंतर सदस्य पर्यावरण जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, बैठकीत करण्यातआलेल्यासूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात आली असून त्याचे ईतिवृत्त व रेकॉर्डींग जनतेकरिता प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, जोग सेंटर,३ रा मजला, मुंबई-पुणे रोड, वाकडेवाडी,पुणे, महाराष्ट्र- ४११ ००३ येथे थोड्या दिवसात उपलब्ध करून देण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना जनसुनावणीतील उपस्थित झालेल्याबाबींचा आढावा घेऊन उपस्थितांचे आभार मानून जाहीर जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **(प्रताप जगताप )**<br>समन्वयक, पर्यावरणविषयकक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, पुणे-१ | **(नितीन शिंदे)**<br>सदस्य, पर्यावरणविषयकक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्र. प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, पुणे | **(डॉ. जयश्री कटारे )**<br>अध्यक्ष, पर्यावरणविषयकक जाहिर जनसुनावणी समिती तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पुणे |